दै. मराठवाडा नेता दि. ०४/०७/२५

नशेच्या औषधी विक्री करणाऱ्या

# मेडिकल स्टोअर्स विरुद्ध कडक कारवाई

**नांदेड : (म नेता)**

शहरात दाखल झालेल्या पथकाने २५ व २६ जून रोजी शहरातील विविध भागातील मेडिकल स्टोअर्सची तपासणी केली आहे. या कार्यवाहीत एकूण १३ मेडिकल स्टोअर्सची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २ दुकानामध्ये नशेच्या औषधांची, गोळयाची विक्री होत असल्याचे स्पष्ट झाले. इतर ९ मेडिकल स्टोअर्सकडे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ मधील नियम ६५ नुसार त्रुटी आढळून आलेल्या आहेत. उर्वरित २ मेडिकल स्टोअर्सकडे तपासणी दरम्यान सर्वसाधारण जुटी आढळलेल्या आहेत.

सहायक आयुक्त (औषधे) नांदेड यांनी नांदेड कार्यालयात औषध निरीक्षकाची मंजूर पदे रिक्त असल्याने सहआयुक्त (औषधे) छत्रपती संभाजीनगर यांच्याशी तात्काळ संपर्क साधून नशेच्या औषधी, गोळयाची विक्री करणाऱ्या औषधी विक्री दुकानांविरूद्ध विशेष मोहिम राबविण्यासाठी बाहेरील जिल्ह्यातून (छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, हिंगोली औषध निरीक्षक नांदेड येथे पाठविण्यात यावेत अशी विनंती केली आहे. नशेच्या औषधी / गोळयांची विक्री करणाऱ्या तसेच गंभीर स्वरूपांच्या त्रुटी आढळून आलेल्या मेडिकल स्टोअर्सविरूद्ध (दोषीविरूद्ध) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा व नियमातील तरतूदीनुसार कारवाई घेण्यात येत आहे. यापुढे नशेच्या औषधी, गोळयांची विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सविरूध्द कारवाई घेतली जाणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे येथील सहायक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांनी दिली.